ईलिलाव सुचना

जा.क्रं.नांवाशमनपा/जवमा/ 10102/२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक - 31 OCT 2025

## ई - लिलाव सुचना

सर्व नोंदणीकृत संस्था यांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र येथील दुकानापैकी दुकान क्रं.०१ ते १० च्या वरील छताची जागा ३० वर्षासाठी भाडेपट्टीवर द्यावयाचे आहे.

ईच्छुक नोंदणीकृत संस्था यांनी लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

नोंदणीकृत संस्था यांनी लिलाव फी रूपये ५०००/- नापरतावा व अनामत रक्कम म्हणून रू.२,००,०००/- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांच्या नावे असलेले खाते क्रं.३१८०१०२०००००२१३ IFSC CODE - UTIB0000३१८ ॲक्सीस बँक, शाखा कलामंदिर, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करून त्या बाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे.

सदरील ई-लिलावाच्या नियम व अटी तसेच साईटवर अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, सदरचा ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन इंटरनेटवर भरता येईल.

**ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्रं | तपशिल | लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्ध दिनांक | 01/11/2025 | १५:०० |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 01/11/2025 | १६:०० |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 10/11/2025 | १५:०० |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 10/11/2025 | १५:०० |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 12/11/2025 | १८:०० |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 13/11/2025 | ११:०० |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 13/11/2025 | १७:०० |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत-

१) संपादक, दै. उद्याचा मराठवाडा यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील ई-निविदा सूचना आपल्या दि.01/11/2025 च्या वृत्तपत्रात 12X20 चौ.मी. आकारात कमीत कमी जागेत प्रसिद्ध करून बिलाच्या २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

२) ई-टेंडरींग/ऑक्शन विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव

३) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र.०१ ते १० च्या वरील छताची जागा भाडेपट्टीवर देणेसाठी ई-लिलाव नियम अटी

## प्रस्तावना

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र येथील दुकानापैकी दुकान क्र.०१ ते १० च्या वरील छताची जागा भाडेपट्टीवर द्यावयाची आहे. सदर जागेवर बांधकामासाठी रु.८५,१०,४४९/- एवढा खर्च करणे अनिवार्य आहे. सदरील खर्च करुन बांधकाम करण्याच्या अटीवर सदर जागा नोंदणीकृत संस्थेस ई-लिलावाने भाडेपट्टीवर द्यावयाची आहेत.

- **वेबसाईटवर (http://eauction.gov.in) अपलोड करावयाची कागदपत्रे §**
- ई-लिलावात भाग घेण्यासाठी नोंदणीकृत संस्थेची कागदपत्राची प्रत अपलोड करणे.
- ई-लिलावात भाग घेण्यासाठी रक्कम रु.५,०००/- (ई-लिलाव प्रवेश शुल्क नापरतावा) तसेच अनामत रक्कम रु.२,००,०००/-आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नावे असलेले खाते क्र.३१८०१०२००००२१३, IFSC CODE - UTIB००००३१८ अँक्सीस बँक, शाखा कलामंदीर, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करुन त्याबाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे. जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन जागा घेणार नाहीत अशा बोलीधारकांची अनामत रक्कम रु.२,००,०००/- जप्त करण्यात येईल. तसेच सदरील ई-लिलावात ज्या बोलीधारकांना जागा भेटली नाही त्या बोलीधारकांची अनामत रक्कम रु.२,००,०००/- परत करण्यात येईल.
- महानगरपालिका हद्दीतील मालमत्तेचा सालसन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर, पाणी कर इत्यादी भरणा केलेली पावती (महानगरपालिका हद्दीत मालमत्ता नसल्यास त्याबाबतचे लेखी स्वयंघोषणापत्र) तसेच महानगरपालिकेची कोणतीही थकबाकी प्रलंबीत नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र देखील अपलोड करणे अनिवार्य आहे.
- **ई-लिलाव अटी व शर्ती -**

१) ई-लिलावात भाग घेण्यासाठी डिजीटल सिग्निचर असणे अनिवार्य आहे.

२) सदर ई-लिलावात भाग घेण्यासाठी रुपये ५,०००/- ई-लिलाव फिस भरणा करावी लागेल.

३) सदरील छताच्या जागेवर बांधकाम खर्च रक्कम रु.८५,१०,४४९/-एवढा करणे अनिवार्य आहे.

४) जागा भाडे रक्कमेच्या वर १,०००/- च्या पटीत बोलणे अनिवार्य आहे.

५) सदरील जागेवर ०१ वर्षाचे आत बांधकाम करणे अनिवार्य आहे.

६) सदर दुकान क्र.०१ ते १० च्या वरील छताच्या जागेचा भाडेपट्टा कालावधी ३० वर्षाचा असेल.

७) काबरानगर येथील व्यापारी संकुलनातील सदर दुकान क्र.०१ ते १० च्या वरील छताच्या जागेचे क्षेत्रफळ १८० चौ.मी आहे. सदर जागेसाठी मासीक भाडे चालु बाजारभाव दराप्रमाणे (R.R.) रु.८,४००/- एवढे आहे. सदरील मासिक भाडे यावर जी.एस.टी आकारण्यात येईल. तसेच सदरील भाडेमध्ये दर ०३ वर्षाला १०% वाढ करण्यात येईल.

८) अनामत रक्कम म्हणुन ०३ महिन्याचे भाडे महानगरपालिका फंडात भरणा करणे अनिवार्य आहे.

९) मासिक भाडे थकीत राहिल्यास त्यावर प्रतीमहा ०२ टक्के सरळव्याज आकारण्यात येईल.

१०) लिलावधारकाने स्वखर्चाने नोंदणीकृत करारनामा महानगरपालिकेस करुन द्यावा लागेल.

११) सदर जागेत पोटभाडेकरु ठेवावयाचा असल्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊनच नियमानुसार पोटभाडेकरु ठेवावा लागेल.

१२) महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय भाडेपट्ट्याचे हस्तांतरण परस्पर केले जाणार नाही किंवा मालमत्ता गहाण/तारण ठेवली जाणार नाही. तसेच त्यावर त्रयस्त पक्षाचे हितसंबंध प्रस्थापित/निर्माण करता येणार नाहीत.

१३) सदरील जागा वापर करताना त्या इमारतीमधील इतर भाडेकरुंना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच सदर जागेमध्ये बियरबार, परमीट रुम, मटन दुकान, गिरणी, छापखाना, स्फोटक वस्तू असे

व्यवसाय व इतरांना त्रास पोहचविणा-या व्यवसायासाठी वापर अनुज्ञेय राहणार नाही याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आयुक्तांचा निर्णय अंतीम राहील.

१४) सदर जागेमध्ये बांधण्यात येणा-या वास्तुमध्ये अंतर्गत विद्युतीकरणासाठी आवश्यक ते वायरींगचे काम संबंधीतांना महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊनच स्वखर्चाने करुन घ्यावे लागेल. विद्युत मीटर जागा भाडेकरुस बसवुन घ्यावे लागेल. तसेच देखभालीसाठी येणारा खर्च संबंधीतास स्वत: भरणा करावा लागेल. याबाबतीत भाडेकरुस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१५) जागाधारकास महानगरपालिकेचे जागेचे भाडे, मालमत्ता कर व इतर कर नियमीत भरणा करणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडुन व्यवसाय परवानाही घ्यावा लागेल.

१६) सदर जागेमध्ये जागाधारकास महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय सदर जागेमध्ये बांधकाम करावे लागेल तसेच सदर जागेवर बांधण्यात येणारे बांधकाम महानगरपालिका उपअभियंता यांच्या नियंत्रणाखाली करणे अनिवार्य आहे.

१७) सदर जागेचे सहा महिन्यापेक्षा जास्त दिवस भाडे थकीत राहिल्यास त्या विरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८१ नुसार तसेच यासंबंधीत असलेले नियम /शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन अनामत रक्कम जप्त करुन थकीत रक्कम वसुलीची कारवाई करण्यात येईल.

१८) बोलीधारकांनी बोललेल्या अंतीम बांधकाम खर्च बोली रक्कमेमध्ये काही तांत्रिक किंवा बोलीधारकाने वेबसाईटवर अपलोड केलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळुन आल्यास अंतीम बोलीधारक ठरविण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

१९) ई-ऑक्शन या संकेतस्थळावर प्राप्त झालेली बोलीची नोंद हीच अंतीम असेल.

२०) सदरील ई-लिलाव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा, नियम अटीमध्ये अंशत: बदल करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना राहील. त्याबाबत लिलावधारकास कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

२१) सदर ई-लिलाव https://eauction.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येत आहे.

२२) सदरील नियम अटी https://eauction.gov.inया संकेतस्थळावर तसेच www.nwcmc.gov.in या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर, मनपा मुख्य प्रशासकिय इमारत येथे नोटीस बोर्डवर, मुख्य प्रशासकिय इमारत मालमत्ता विभाग (कक्ष क्र.२१५) इत्यादी ठिकाणी पहावयास मिळतील.

२३) सदरील लिलाव हा ई-लिलाव असुन बोलीधारक यांना उपरोक्त नमुद कागदपत्र वेबसाईटवर अपलोड करावयाची आहेत. सदरील कागदपत्रांची पूर्तता न केल्यास त्यांची बोली रद्द करुन संबंधीतास लिलाव प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

उपआयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड